VOL- XI ISSUE- VI JUNE 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# अण्णा भाऊ साठे यांच्या शेटजीचे इलेक्शन या लोकनाट्यातील सामाजप्रबोधन

**डॉ. अनुसया नागनाथ नागिमे**
सहाय्यक प्राध्यापक,
जयक्रांती कॉलेज ऑफ एज्युकेशन, लातूर

आधुनिक मराठी साहित्यामधील 'लोकनाट्य' हा विषय अभ्यासताना अण्णाभाऊ साठे यांचे नाव सर्वप्रथम येते.याचे कारण 'लोकनाट्य' या कलाप्रकाराच्या निर्मितीचा मान अण्णाभाऊ साठे यांना दिला जातो.याविषयी शाहीर पां. तु. पाटणकर म्हणतात,"लोकनाट्य हे तमाशाचे आधुनिक रूप. लोकनाट्य ह्या शब्दाचे जन्मकर्तुत्व मात्र अण्णाभाऊंकडे योगायोगाने आले.संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आधीचे दिवस होते ते.महाराष्ट्रापासून मुंबई तोडून ती गुजरातच्या पारड्यात टाकण्यासाठी किंवा स्वतंत्र ठेवण्यासाठी महाराष्ट्रद्वेषा राजकारण्यांची तेंव्हा जोरात खटपट चालली होती. अण्णाभाऊ तेंव्हा लालबावट्या कलापथकाद्वारे आपल्या लेखणीचे फटकारे अशा संधीसाधू भोंदू व स्वार्थी राजकारण्यांवर व मुंबई शासनावर ओढीत होते. त्यामुळे चिडून जाऊन मोरारजी देसाईंनी त्यांच्या कलापथकावर व तमाशावर बंदी आणली. अण्णाभाऊंनी डोके लढवले. त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखो कामगारांसमोर सादर केला व सुरुवातीला स्टेजवरून जाहीर केले की,मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे; म्हणून आज आम्ही आपल्यासमोर 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर करीत आहोत."[१] यावरून असे म्हणता येते की, 'लोकनाट्य' या कलाप्रकाराची निर्मिती अण्णाभाऊ साठे यांनी केली आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी कथा, कादंबरी,लोकनाट्ये, चित्रपट कथा व शाहिरीकाव्य इ. लेखन प्रकार हाताळले.तसेच शाहीर,नट,कलापथकाचे चालक,दिग्दर्शक, निर्माता,लोकनाट्यकलावंत म्हणून लोकप्रियता मिळवली. अण्णा भाऊंनी एकूण १४ लोकनाट्ये लिहिली आहेत. १९४५ ते १९६२ या काळात ही लोकनाट्ये त्यांनी लिहून स्वतःच प्रेक्षकांसमोर सादर केली.अकलेची गोष्ट,बिलंदर बुडवे,खापऱ्या चोर,शेटजीचे इलेक्शन,पुढारी मिळाला,मूक मिरवणूक, पेंग्याचं लग्न,निवडणुकीतील घोटाळे, देशभक्त घोटाळे,दुष्काळात तेरावा, बेकायदेशीर,माझी मुंबई, लोकमंत्र्यांचा दौरा इ.लोकनाट्ये त्यांनी लिहिली आहेत.याविषयी शाहीर पां. तु. पाटणकर म्हणतात,"लेखन,दिग्दर्शक,नट, शाहीर,निर्माता अशा विविध अंगाची लोकनाट्य जगलेल्या अण्णाभाऊ व्यतिरिक्त दुसरा लोकनाट्य कलाकार महाराष्ट्रात दुर्मिळच."[२] यावरून असे म्हणता येते की,अण्णाभाऊ साठे यांनी अनेक लेखन प्रकारात आपली प्रतिभा सिद्ध केली असली तरी लोकनाट्य या कलाप्रकारातील त्यांच्या विविधांगी भूमिकेमुळे ते प्रतिभाशाली लोकनाट्यकार म्हणून महाराष्ट्रात लोकप्रिय आहेत.

ऐतिहासिक दृष्टीने वीर रसाला महत्त्व देणारी ती शाहिरी व श्रृंगार रसाला महत्त्व देणारा तो तमाशा या परंपरागत समजुतीला अण्णा भाऊ साठे यांनी छेद दिला. याविषयी डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात,"अण्णाभाऊ साठे यांनी ह्या लोककलेविषयीच्या परंपरागत समजूती बदलून टाकल्यात.समाज परिवर्तनासाठी आणि क्रांतीसाठी लोक रंजनापेक्षाही लोकशिक्षणाची आवश्यकता असते हे भान ठेवून त्यांनी लावणी आणि तमाशा या रंजन कलेला लोकशिक्षणाकडे वळवण्याचा प्रयत्न केला.लोक शिक्षण याचा अर्थ लोकांना वस्तुस्थितीचे आणि परिस्थितीचे यथार्थ ज्ञान करून देणे."[३] यावरून असे म्हणता येते की,अण्णाभाऊ साठे यांनी वास्तविक परिस्थितीचे सत्यदर्शी चित्रण करून समाजपरिवर्तन व लोकजागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने लोकनाट्याची निर्मिती केली.याचाच प्रत्यय 'शेटजीच इलेक्शन' या लोकनाट्यातून येतो.या लोकनाट्याची निर्मिती अण्णाभाऊ साठे यांनी १९४६ साली केली.ज्या काळात अण्णाभाऊ साठे यांनी हे लोकनाट्य लिहिले तो स्वातंत्र्य पूर्व चळवळीचा होता.याच वेळी देशातील पहिली निवडणूक घेण्यात आली.या निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाच्या ध्येय धोरणांचा लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला परिचय करून देण्यासाठी प्रचार व प्रसार केला जात होता.अण्णाभाऊ साठे यांनी ज्या काळात लोकनाट्ये लिहिली होती त्या विषयी रामनाथ चव्हाण म्हणतात,"अण्णाभाऊ त्या काळात झपाटून लिहित होते. लाल बावटा कला पथकातून गीत गात होते.तेंव्हा मात्र

त्यांच्याकडे फारसं कुणाचं लक्ष नव्हतं. मुळातच मार्क्सवादी चळवळीतला कामगार लढयातला कार्यकर्ता,लेखक एवढीच अण्णांची त्या काळात ओळख असायची.शाहीर अमर शेख,शाहीर गव्हाणकर या कलावंत मित्रांच्या साथीने ते पार्टीचे पूर्णवेळ काम करायचे आणि पार्टीच्या ध्येयधोरणानुसार कलापथकातून जाहीर कार्यक्रम सादर करायचे.लोकनाट्य,फार्स, पोवाडे,लावण्या,समग्र गीते यातून त्यांनी उभा महाराष्ट्र ढवळून काढलेला होता."[४]यावरून असे म्हणता येइल की, स्वातंत्र्यप्राप्तीच्या पाश्वभूमीवर समाजातील परिस्थितीचे यथार्थ चित्रण करून मार्क्सवादी पक्षाच्या विचारसरणीच्या ध्येयधोरणांच्या प्रचारार्थ आपली भूमिका मांडण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी 'शेटजीचे इलेक्शन' हे लोकनाट्य लिहिले आहे.

निवडणूक जवळ आल्यावर काँग्रेस कमिटीच्या ऑफिसमध्ये निवडणुकीसाठी अनेक अर्ज येतात.काँग्रेसचा अध्यक्ष सखाराम बापू आलेल्या अनेक अर्जापैकी मगरचंद या गुजराती व्यक्तीचा अर्ज शिफारशीसाठी निवडतो.कारण मगरचंद १९४२ च्या आंदोलनात ब्रिटिशांविरुद्ध उभा राहिलेला असतो.वॉर फंडाच्या कमिटीचा चेअरमन असलेला मगरचंद श्रीमंत वर्गातील असतो. शेतकऱ्यांच्या आंनदोलनातही काळा बाजार करून त्याने पैसा कमावलेला असतो.गरीब शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांची पिळवणूक करून मिळवलेल्या याच पैशाच्या जोरावर कायदेमंडळात जाऊन प्रतिष्ठा मिळवण्याचा बेत करतो. निवडणूक फंडावर बोजा पडू नये याचे निमित्त करून तो निवडणूक सभेला फंड म्हणून पन्नास हजार रुपयांची लाच देऊन स्वतःच्या नावाची शिफारस करण्यास सांगतो.शतकानुशतके व्यापारी, सावकार व जमीनदार यांचा एक श्रीमंत वर्ग व सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी,कामकरी यांचा एक गरीब वर्ग असे दोन वर्ग समाजात अस्तित्वात होते.यातील उच्चवर्गीय राजकारणात प्रवेश करून गरीब शेतकरी,कष्टकरी यांच्यावर सत्ता गाजवण्यासाठी त्यांचाच पुढारी होण्याचा कट करतात. याचे वर्णन अण्णाभाऊ साठे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

“नामी एक गाव रहिमतपूर । राहात होता तेथे एक सावकार । नाव त्याचे मगरचंद गुजर। श्रीमंत थोर । अफाट जमीन त्याच्या घरी। होता मानकरी। करी व्यापार ॥१ लढाईचा पुरा फायदा घेऊन ।नफ्याने हात घेतले धुऊन ।चौफेर काळाबाजार करून ।नाडले जन । जवळचा पैसा खर्चून । मिळवावा मान । विचार केला त्यांन ॥२ ॥” [५]अशा प्रकारे अनेक पिढ्यांपासून शेतकऱ्यांची पिळवणूक करून सावकार ,जमीनदार श्रीमंत झाले व व्यापाराच्या माध्यमातूनही त्यांनी उच्चवर्गीय म्हणून सामाजिक प्रतिष्ठा मिळवली याचे चित्रण करून शेतकरी,कष्टकरी,कामकरी जनतेची लुबाडणूक करणारी उच्चवर्गीयांची स्वार्थी व्यापारीवृत्ती अण्णाभाऊ साठे यांनी दर्शविली आहे.

भ्रष्ट व्यापाऱ्यांनी 'काळा बाजार' करून राजकारणात प्रवेश करून पांढरे कपडे परिधान केले तरी जनतेचे कल्याण करण्याऐवजी शेवटी ते भ्रष्टाचारच करणार आहेत,शेतकरी - कामगारांचे राज्य आणावयाचे स्वप्न दाखवून स्वतःचाच फायदा करून घेणार आहेत अशी अण्णाभाऊंची धारणा होती.

मगरचंद गीत गातो-

"मला तिकीट मिळालं। मी असेंब्ली - मेंबर होणार। आजवर होतो कावळा। केला बाजार काळा। ढवळा बगळाच आता मी शोभणार ॥१॥”[६] अशा प्रकारे काळा बाजार करणारे व्यापारी,सावकार व जमीनदार व होऊ घातलेले पुढारी या उच्चवर्गीयांच्या वर्तनातील दांभिकपणा अण्णाभाऊ साठे यांनी उघड केला आहे.

सत्तू' हा या लोकनाट्याचा नायक असून १९४२ च्या आंदोलनात त्याचाही सहभाग असून तो एक क्रांतिकारक असतो व मगरचंदप्रमाणे त्यानेही तुरुंगवास भोगलेला असतो. कायदेमंडळात जाण्यासाठी त्यानेही अर्ज दाखल केलेला असतो.तुरुंगात त्याच्याबरोबर सखाराम बापूही होता.निवडणूकीचे तिकीट मात्र तो गरीब असलेल्या सत्तूला न देता पन्नास हजार रुपये निधी देणाऱ्या मगरचंद व्यापाऱ्याला देतो

“सभासद : अहो तयारी कसली ? आज आमचे तिकीट म्हणजे हुकमी एक्का ! शिवाय आम्ही आहोच ! पण (रुपया अंगठ्यावर वाजवल्याची खूण करीत) निवडणूक फंड

मगरचंद: वा,वा म्हणजे आम्हाला काय काळजी नाही म्हणता ? खिशातून नोटांचे पुंडके काढित) तूर्त ठेवा हे.हा फंड म्हणजे साऱ्यांचा फंड हे काय सांगायला हवं आम्हाला.”[७] निवडणूकीतील मतदानात होणारे घोटाळे उघड करून निवडून येण्यासाठी राजकारणी कोणत्याही पातळीपर्यंत जाऊ शकतात याचे वास्तविक व दूरदर्शी चित्रण अण्णा भाऊ साठे यांनी केले आहे.

सत्तूबरोबर तुरुंगवास भोगलेला सखाराम बापू निवडणूकीच्या वेळी त्याला ओळखही दाखवत नाही.उलट सत्तू गरीब असल्यामुळे व कामिटीला त्याने निधी दिला नसल्यामुळे सखाराम बापू त्याला अपमानास्पद वागणूक देतो.याचे वर्णन अण्णा भाऊ साठे पुढीलप्रमाणे करतात.-

"सखाराम बापू : अरे सत्तू, त्याचं असं आहे 'जेनू काम तेनू थाय, आहे बिजा करे सो गोता खाय !' कायदेमंडळात जाऊन तू शेतकरीगडी काय करणार ?

सभासद:तसं नव्हे रे श्रमविभाग आहे. शेतकऱ्यांनी शेती करावी-

सत्तू: चळवळ करावी, तारा तोडाव्या,फटके खावे, तुरुंगात जावं नि तुमी कायदेमंडळात जाऊन बसावं !असंच नव्हं ?

सखाराम बापू : अरे, तुम्ही चळवळ केली, तारा तोडल्या- ठीक आहे, पण असेंब्लीत काय तारे तोडणार तुम्ही ? अरे बाबा हे राजकारण म्हणजे काय हलकी गोष्ट आहे ? शिवाय आता क्रांती करायची आहे ! मजूर- शेतकरी राज्य करायचं आहे ॥"[८] शासन उच्चवर्गीयांची बाजू घेऊन त्यांचे समर्थन करते व सर्वसामान्य शेतकरी,कष्टकरी जनतेची मात्र ते सामाजिक अवहेलना करते याचे वास्तविक चित्रण अण्णा भाऊ साठे यांनी केले आहे.

अण्णाभाऊंनी चरितार्थासाठी कापड गिरणीत नोकरी केली. त्यावेळी कामगारांचे प्रश्न,त्यांचे शोषण यांचा जवळून अनुभव त्यांनी घेतला व कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीचा पुरस्कार केला.याविषयी रामराव गवळी म्हणतात,"कम्युनिस्ट चळवळीने ते प्रभावी झाले.त्यातूनच सन १९३६ मध्ये अण्णाभाऊंनी कॉंग्रेस डांगे यांच्या उपस्थित कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला.अण्णाभाऊ कॉम्रेड झाले. लालबावटा खांद्यावर घेऊन वर्गअंताच्या लढाईत साम्राज्यवाद व भांडवलशाही विरुद्ध झुंजणाऱ्या श्रमिक कामगारांच्या फलटण येथील अण्णाभाऊ सैनिक झाले."[९] उच्चवर्गीयांचा साम्राज्यवाद व व्यापारवाद नष्ट करून शेतकरी, कष्टकरी, कामकरी यांच्या हितासाठी प्रयत्नशील असणाऱ्या कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रचार व प्रसार अण्णाभाऊ साठे यांनी केला.

याच कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीचा पुरस्कार अण्णाभाऊ साठे यांनी 'सत्तू' या नायकाच्या चित्रणातून केला आहे.सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडल्या आहेत व पुढारीही शेतकऱ्यांचे राज्य आणावयाचे खोटे स्वप्न दाखवुन तेही त्यांच्यात सहभागी झाले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभा व लाल बावटा कलापथकाची कामे सत्तू करीत असतो.याच कारणामुळे गावातील पाटील व व्यापारी त्याला आपला शत्रू मानू लागतात.सखाराम बापू याचा जाब त्याला विचारतो.त्यावेळी सत्तू उत्तर देतो.-

"सत्तू : खरं हाय.तुमच्यावाणी 'खोबरं तिकडं चांगभलं' करायचं कळत न्हाई आमाला ! जिथं शेतकऱ्यांच्या हिताचं काम व्हतंय तिथं आम्ही काम करतो.आम्ही आपलं बारकं शेतकरी.तुमी हत्तीवाणी मोठं पुढारी ! 'दावायचं दात येगळं नी। चावायचं येगळं. म्हन 'शेतकऱ्याचं राज करायचं हाय."[१०] शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे,त्यांच्या अडचणी दूर करण्याचे आश्वासन शासन देत असले तरी सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले आहे.समाजातील श्रीमंत वर्गाच्या समर्थनार्थ उभे राहून गरीब कष्टकरी,शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून स्वतःचा स्वार्थ त्याने साधून घेतलाआहे.अशा प्रकारे शासनाच्या कृती व उक्तीत मात्र फरक पडला असून कम्युनिस्ट पक्ष मात्र कष्टकरी, कामकरी,शेतकरी यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहे हे अण्णाभाऊंनी सत्तूच्या चित्रणातून दर्शवले आहे.

सत्तू करत असलेल्या किसान सभेच्या व लाल बावटा कलापथकाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यास त्याची पत्नी ताराचाही पाठिंबा असतो.व्यापारी लोकांना सर्वसामान्य शेतकरी,कष्टकरी यांच्या शेतातील कष्टाची जाणीव नाही,कोणताच अनुभव नाही,त्यांनी राजकारणात प्रवेश केला तरी कष्टकरी,शेतकरी यांचे श्रम, दुःख, प्रश्न त्यांना समजणार नाहीत असे अण्णा भाऊ मत होते.हेच मत तारा धोंडिबाला पटवून देते.याचे अण्णा भाऊंनी केलेले वर्णन-

"तारा: कुनाचं खातुयास? त्या मगरचंदाचं ? तेच्या बानं तरी कदी नांगोर बघतलाता काय रं ? तुझ्या त्या मालकाला बैलाला कासरा कसा लावत्यात ते तरी ठावं हाय का ? ...का रं आता का वाचा बसली? सांग की, कोन राबतयं शेतात ? तु का तुझा मालक ?...लाल बावट्याला शिव्या द्याचं कळतयं ? किसान सभेला शिव्या द्याचं कळतयं?"[११] व्यापारी,सावकार व होऊ घातलेले पुढारी यांच्या वर्तनुकीतील दांभिकपणा दर्शवून राजकीय पक्षाचा कार्यकर्ता सर्वसामान्य जनतेच्या प्रतिनिधीत्वाची धुरा सांभाळू शकत नाही असे अण्णाभाऊ साठे यांनी सुचवले आहे.

उच्चवर्गीयांनी अत्याचार करून वैयक्तिक फायद्यासाठी शेतकरी,कष्टकरी, कामकरी यांना नोकर बनविले.सामान्य वर्गातील काही लोकांनीही आपल्या वर्गातील लोकांना विसरून त्यांची नोकरी स्वीकारली,स्वतःच्या जमिनीवरचा हक्कही ते विसरले.त्यामुळे त्यांना पोट भरण्यासाठी अन्नधान्य मिळेनासे झाले आहे,सामाजिक प्रतिष्ठाही त्यांनी गमावली आहे.याविषयी त्यांच्यात वर्गीय जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे अशी अण्णा भाऊंची धारणा होती.हीच वर्गजाणीव व दास्यत्वाची जाणीव ते धोंडिबाला ताराच्या ताराच्या बोलण्यातून करून देतात.त्यामुळे त्याचा स्वाभिमान जागृत होतो.वर्गीय जाणीव झालेल्या धोंडिबा या काम कामकऱ्याचे अण्णा भाऊंनी केलेले चित्रण-

"लुबाडलं ज्यांन माझ्या जमिनीला । केलं पार कंगाल मला । आपुला बंदा गुलाम बनविला । लावुनी हलक्या सलक्या कामाला। करतो अपमान वेळोवेळी । लाचार बनलो, महाग अन्नाला । परी तारांन मार्ग दावला । शेतकरी तारील शेतकऱ्याला । वठणीवर आणावा सावकाराला । बेत त्यानं

केला"[१२] अण्णा भाऊंनी गरीब शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांच्या आर्थिक,सामाजिक,दास्यत्वाला, हालअपेष्टांना व आर्थिक विघटनाला समाजातील उच्चवर्गीय लोकांना कारणीभूत ठरवले आहे. त्यामुळे त्यांनी दास्यत्वाचे जीवन जगणे सोडून वर्गीय जाणीव,आत्मभान जागृत करून स्वाभिमानाने जगण्याचा संदेश अण्णाभाऊ साठे यांनी दिला आहे.

मगरचंद व धोंडीबा यापैकी एकमेकावर कोणीही संतापणार नाही व संतापला तर त्याचा कान कापण्यात येईल असा त्यांच्यात करार करण्यात आला.याचे अण्णा भाऊंनी केलेले वर्णन-

"एक धनी दुसरा चाकर। केला करार मिळुन दोघानं ॥ भरू नये रागं एकानं ।जावं ना दुसऱ्यानं काम सोडून॥ हा करार मोडील कोण ।घ्यावा कापून । तयाचा कान॥[१३] शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांना त्यांच्या दास्यत्वाची जाणीव करून दिल्याशिवाय ते आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध बंडाची भूमिका घेणार नाहीत असे मत धोंडीबाच्या व्यक्तिचित्रणातून अण्णा भाऊंनी व्यक्त केले आहे.

सत्तूला उमेदवारी नाकारून मगरचंदला उमेदवारी दिल्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो.निवडणूकीच्या प्रचारादरम्यान सत्तू,तारा,धोंडिबा मगरचंदला अनेक प्रश्न विचारतात.परंतु मगरचंदला मात्र त्यांच्या प्रश्नांची नीट उत्तरे देता येत नाहीत.कायदेमंडळाच्या निवडणूकीत निवडून आल्यावर रस्ते, शाळा, विहीर,दवाखाना,मंदिर,धर्मशाळा बांधून देण्याचे ,स्वराज्य मिळवून देण्याचे शेतकरी-मजूर राज्य करण्याचे अशी पोकळ व खोटी आश्वासने पुढारी देतात परंतु ती खोटी असतात हे व्यापारी व होऊ घातलेला पुढारी मगरचंद याचे चित्रण करून अण्णा भाऊंनी दर्शविले आहे.कायदेमंडळाच्या निवडणूकीत निवडून आल्यावर काय करणार ? या सत्तूच्या प्रश्नाला मगरचंद उत्तर देतो.

"मगरचंद: सडका नीट करीन गावाच्या ।पायऱ्या घाटाच्या॥ पूल एक दगडी बांधीन। रस्त्याला रस्ता सांधीन ।देवळावर कळस चढवीन। आड काढीन ।शाळा एक मोठी उघडीन। पोरांबाळांना देऊ ज्ञान॥ धर्मशाळा वाटसरुंसाठी॥ करू खटपटी॥ दवाखाना आणू एक गावाला॥ रोग नाही येणार नावाला॥[१४]अशा प्रकारे निवडणूकीतील होऊ घातलेल्या पुढाऱ्यांच्या वर्तनातील दांभिकपणा अण्णा भाऊंनी उघड केला आहे.

पिढ्यानपिढ्यांपासून कर्जासाठी सावकाराच्या ताब्यात असलेल्या जमिनी शेतकरी,कष्टकरी यांना परत मिळत नाहीत उलट त्या कर्जावरील व्याज वाढत जाऊन कर्ज मात्र फिटत नाही त्यामुळे त्यांच्या हालअपेष्टां झाल्या आहेत.यासाठी सावकाराकडे जमीन गहाण न ठेवण्याचा कायदा अस्तित्वात आणण्याची मागणी अण्णा भाऊ, अमर शेख, गव्हाणकर यांनी कम्युनिस्ट पक्षामार्फत केली. 'कसेल त्याची जमीन' ही चळवळ प्रभावी करण्यासाठी लाल बावटा कला पथकातून अण्णाभाऊ,अमर शेख, गव्हाणकर यांनी भजन, पोवाडे, गीते,लोकनाट्य,लावण्या,गाऊन शेतकरी जागृतीचे कार्य केले.त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करते हे अण्णा भाऊंनी वर्गीय जाणीव झालेल्या सत्तूच्या चित्रणाद्वारे केली आहे.

"सत्तू: शेतकऱ्यांचा। न्याय हक्काचा कायदा कसाला लावाल का? ॥

मगरचंद: पचेल ते खावा। शोभेल ते ल्याव ।भलतं सलतं काय मागू नका।

सत्तू : पोटाला पोटभर ।मिळाया भाकर जमीन घरोघर वाटाल का ? ॥

मगरचंद :तुझ हे बोलणं । तिरकस चालणं । सांग कोणाला पटंल का ?॥

सत्तू : कर्जमाफीचा। (सावकारांच्या ) जमीन जप्तीचा ॥ कायदा सक्तीचा आणाल का ?॥[१५] अशा प्रकारे कर्जमुक्ती व सावकाराकडे जमीन गहाण न ठेवण्याचा कायदा अस्तित्वात आणण्याची मागणी सत्तूच्या चित्रणातून करून शोषणमुक्त व लोकशाही मूल्यांवर आधारित नवसमाजनिर्मितीचे आपले काळाच्या पुढे जाणारे क्रांतिकारक विचार अण्णा भाऊंनी मांडले आहेत.

अन्य देशाप्रमाणे जमिनीच्या समान वाटपाच्या धोरणाचा स्वीकार करून गरीब शेतकऱ्यांच्या कल्याणाची भूमिका शासन घेत नाही याविषयी सत्तू मगरचंदजवळ नाराजी व्यक्त करतो.त्याची पत्नी ताराही कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांचा व कार्यपद्धतीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या किसान सभा व लालबावटा कला पथकाच्या सहकार्यातून हे साध्य होऊ शकते असा विश्वास दर्शविते.

"सत्तू: रशियात, बल्गेरियात, पोलंड देशात -वाईच बघा की जगाकडं।

मगरचंद: अरे, ते तिकडं झालं। इथं कसं कोण करणार ?

तारा: किसानभंचा लाल बावटा।

मगरचंद: लाल बावटा काय रशियातून जमिनी आणणार नि वाटणार ?

तारा : ते कशापायीनं ? माप तुमच्यावानी एक एकाच्या घरात हजार,हजार दोन दोन हजार एकर जिमिन पडलीया !" [१६] कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असून तिच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून सामाजिक परिवर्तन घडवून आणावे असा संदेश अण्णाभाऊ साठे यांनी दिला आहे.

शोषित घटकांनी सुखी व्हावे,समाजात प्रतिष्ठा मिळावी,त्यांच्या विकासाला बाधा आणणारे सामाजिक व आर्थिक अडथळे दुर व्हावेत यासाठी अण्णा भाऊ क्रांतीचा मार्ग स्वीकारतात. सत्तू ,तारा,धोंडिबा यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मगरचंदला देता येत नाहीत.त्यांच्यात झालेली एकी पाहून तो धोंडिबावर संतापतो व कान कापण्याच्या भीतीने प्रचारार्थ ठिकाणाहून पलायन करतो.

शेवटी कवी गीत गातो-

"शेतकरी आमि झालो समदं लाल बावटेवालं I देऊ एकीचा गुद्दा ठेवून आडवाया कुनी आलं II"१७ अशा प्रकारे शेतकरी, कष्टकरी यांनी सामाजिक प्रतिष्ठा, न्याय मिळवण्यासाठी एकजूटीने उच्च वर्गीयांविरुद्ध, व्यवस्थेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध बंडाची भूमिका घेण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीचा स्वीकार करण्याचा आग्रह अण्णा भाऊ साठे यांनी केला आहे.

समारोप, समाज प्रबोधनासाठी लोकनाट्याचा शस्त्र म्हणून वापर करून विविधांगी लेखन करणारे,शेतकरी,कष्टकरी,कामगारांच्या दु:खाला वाचा फोडणारे लेखक म्हणून अण्णा भाऊ साठे यांच्याकडे पहावे लागेल.समाजवादाची सद्यस्थितीतील स्थिती पाहता त्या काळामध्ये अण्णा भाऊंनी आपल्या लोकनाट्यातून केलेले समाजप्रबोधनाचे कार्य अलौकिकच म्हणावे लागेल

**निष्कर्ष :**

१.'लोकनाट्य' या कला प्रकाराची निर्मिती अण्णाभाऊ साठे यांनी केली आहे. या कला प्रकारातील विविधांगी भूमिकेमुळे ते प्रतिभाशाली लोकनाट्यकार म्हणून महाराष्ट्रात लोकप्रिय आहेत.

२.अण्णाभाऊ साठे यांनी वास्तविक परिस्थितीचे चित्रण करून समाजपरिवर्तन व लोक जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने लोकनाट्याची निर्मिती केली.

३.स्वातंत्र्य प्राप्तीच्या पार्श्वभूमीवर समाजातील परिस्थितीचे यथार्थ चित्रण करून मार्क्सवादी पक्षाच्या विचारसरणीच्या ध्येय धोरणांच्या प्रचारार्थ आपली भूमिका मांडण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी 'शेठजीचे इलेक्शन' हे लोकनाट्य लिहिले आहे.

४.व्यापाराच्या माध्यमातून अनेक पिढ्यांपासून शेतकऱ्यांची पिळवणूक करून व्यापारी, सावकार, जमीनदार श्रीमंत झाले व याच व्यापाराच्या माध्यमातून त्यांनी उच्चवर्गीय म्हणून सामाजिक प्रतिष्ठाही मिळवली हे अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून दर्शविले आहे.

५.शेतकरी कष्टकरी जनतेची लुबाडणूक करणारी उच्चवर्गीयांची स्वार्थी व्यापारी वृत्ती दर्शवून त्यांच्या वर्तनातील दांभिकपणा अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून उघड केला आहे.

५.निवडणुकीत व्यापारी,सावकार होऊ घातलेले पुढारी हे राजकीय वर्तुळातील भ्रष्ट व्यक्तीच्या संगणमताने घोटाळे करून राजकारणात प्रवेश करू शकतात हे दर्शवून निवडणुकीतील भ्रष्टाचार अण्णा भाऊ साठे यांनी या लोकनाट्यात उघड केला आहे.

६.शासन उच्चवर्गीयांची बाजू घेऊन त्यांचे समर्थन करते व सर्वसामान्य शेतकरी,कष्टकरी,कामकरी जनतेची मात्र ते सामाजिक अवहेलना करते याचे यथार्थ चित्रण अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यात केले आहे.

७.व्यापारी,सावकारकी करून पुढारी झालेला व्यक्ती सर्वसामान्य जनतेच्या प्रतिनिधित्वाची धुरा सांभाळू शकत नाही असे अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून सुचवले आहे.

८.अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यात गरीब शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांच्या आर्थिक,सामाजिक दास्यत्वाला,हालअपेष्टांना व आर्थिक विघटनाला समाजातील उच्चवर्गीय लोकांना कारणीभूत ठरविले आहे.

९.गरीब शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांनी दास्यत्वाचे जीवन जगणे सोडून वर्गीय जाणीव, आत्मभान जागृत करून स्वाभिमानाने जगण्याचा संदेश अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून दिला आहे.

१०.शेतकरी,कष्टकरी,कामकरी या शोसणग्रस्त वर्गाला त्यांच्या दास्यत्वाची जाणीव करून दिली तरच ते उच्चवर्गीयांच्या पिळवणुकीविरुद्ध बंडाची भूमिका घेतील असे अण्णाभाऊ साठे यांनी लोकनाट्यातून सुचविले आहे.

११.कर्जमुक्ती व सावकाराकडे जमीन गहाण ठेवण्याचा कायदा अस्तित्वात आणण्याची मागणी यासारख्या क्रांतिकारक विचारांची मांडणी करून आपली समाजपरिवर्तनवादी भूमिका अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून मांडली आहे.

१२.शोषण मुक्त समाज निर्मितीचे आपले दूरदर्शी क्रांतिकारक विचार मांडून लोकशाही मूल्यांवर आधारित नवसमाजनिर्मितीची अपेक्षा अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून व्यक्त केली आहे.

१३.शेतकरी, कष्टकरी, कामकरी यांनी सामाजिक प्रतिष्ठा व न्याय मिळवण्यासाठी एकजुट करून उच्चवर्गीयांविरुध्द, व्यवस्थेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध बंडाची भूमिका घेण्याचा क्रांतिकारक संदेश अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून दिला आहे.

१४.उच्चवर्गीयांचा साम्राज्यवाद व व्यापारवाद नष्ट करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीचा स्वीकार करण्याचा आग्रह अण्णाभाऊ साठे यांनी या लोकनाट्यात केला आहे.

१५.शासन समाजातील उच्चवर्गीय श्रीमंत व्यापारी, सावकार,जमीनदारांचे हित पाहते तर कम्युनिस्ट पक्ष सर्वसामान्य गरीब शेतकरी,कष्टकरी,कामकरी यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहे हे अण्णा भाऊ साठे यांनी या लोकनाट्यातून दर्शविले आहे.

**संदर्भ टीपा :**

१.प्रा.डॉ.शिवाजी जवळगेकर (संपा.):जननायक अण्णाभाऊ साठे,साहित्य भूषण अण्णाभाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र,लातूर,प्रथम आवृत्ती अण्णाभाऊ साठे जयंती ऑगस्ट २००७ ,पृष्ठ क्रमांक १७६
२.तत्रैव,पृ. क्रं,१७५
३.तत्रैव,पृ. क्रं,१६०
४.तत्रैव,पृ. क्रं,१७१
५.अर्जुन डांगळे,नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे-नाईक, डॉ सुभाष सावरकर- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे: निवडक वाङ्ममय - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, प्रथम आवृत्ती, १ ऑगस्ट १९९८, पृष्ठ क्रमांक १४२
६.तत्रैव,पृ. क्रं.१४४
७.तत्रैव,पृ. क्रं.१४४
८.तत्रैव,पृ. क्रं.१४५
९.प्रा.डॉ.शिवाजी जवळगेकर (संपा.):जननायक अण्णाभाऊ साठे,पृ.क्र.२९४-२९५
१०.अर्जुन डांगळे,नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे-नाईक, डॉ सुभाष सावरकर- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे: निवडक वाङ्ममय, पृ. क्र.१४५
११.अर्जुन डांगळे,नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे-नाईक, डॉ सुभाष सावरकर- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे: निवडक वाङ्ममय -पृ.क्र.१४७
१२. तत्रैव,पृ. क्रं.१४८
१३. तत्रैव,पृ. क्रं.१५०
१४. तत्रैव,क्रं.१५३
१५. तत्रैव,पृ. क्रं.१५४
१६. तत्रैव,पृ. क्रं.१५५
१७. तत्रैव,पृ.क्र.१५६

**संदर्भ ग्रंथ:**

i. प्रा.डॉ.शिवाजी जवळगेकर (संपा.):जननायक अण्णाभाऊ साठे,साहित्य भूषण अण्णाभाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र,लातूर,प्रथम आवृत्ती अण्णाभाऊ साठे जयंती ऑगस्ट २००७
ii. अर्जुन डांगळे,नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे-नाईक, डॉ सुभाष सावरकर- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे: निवडक वाङ्ममय - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, प्रथम आवृत्ती, १ ऑगस्ट १९९८